# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( ____________ विभाग)

क्रमांक : २८-१२-१८ सभा/स्थायी/ क्र. ८.

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. स्थायी समिति सभा<br>दि २८/१२/२०१८ रोजी दु. ३.०० वा. |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : प्रकरण क्र १०८

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २८/०९/२०१८

## मा. विशेष स्थायी समिती सभा

## सभा सूचना क्र. ०९

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ......................................................
स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा शनिवार दि. २९/०९/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०९ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. २९/०९/२०१८ सभा सुचना क्र. ०९ विषय पत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| १०८ | मनपा क्षेत्रातील रस्ते, गटार, पदपथ, बाजार परिसरातील दैनंदिन साफसफाई करणे, दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करुन घनकचरा व्यवस्थापन कामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजूरी देणेबाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

दिनांक :- २८/०९/२०१८

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा./स्थायी समिती सभा दि.२८/९/२०१८

## विशेष // गोषवारा //

**प्रकरण क्र. ९०८ :- मनपा. क्षेत्रातील रस्ते, गटार, पदपथ, बाजार परिसरातील दैनंदिन साफसफाई करणे, दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करून घनकचरा व्यवस्थापन कामाच्या निविदा दरात वाटाघाटीबाबत. (Tender Id No. 2018_MBMC_352669_1)**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, गटार, पदपथ, बाजार परिसरातील दैनंदिन साफसफाई करणे, दैनंदिन घरोघरी जाऊन ओला व सुका कचरा स्वतंत्र गोळा करून घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम 2016 अन्वये वाहतुक करणे कामाची दि.20/04/2018 रोजीच्या दै. नवशक्ती,. महाराष्ट्र जनमुद्रा,. मिड-डे,. लोकसत्ता या वृत्तपत्रात व Tender Id No. 2018_MBMC_311829_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दि. 20/04/2018 ते दि. 22/06/2018 या कालावधीत निविदा मागविण्यात आल्या होत्या.

वरीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेस मुदतीत दि.22/06/2018 पर्यंत एकही निविदा प्राप्त झालेली नव्हती. त्यानुसार दि. 19/07/2018 अन्वये दै. नवशक्ति, लोकसत्ता, ईकोनोमिक्स टाईम्स या वृत्तपत्रात फेर निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच सदर कामी निविदा सादर करण्यासाठी दि.18/08/2018 अन्वये शुध्दीपत्रक प्रसिद्ध करून दि. 04/09/2018 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतीत एक निविदा प्राप्त झाली होती. त्यामुळे सदर कामी स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी दि.12/09/2018 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतीत देखील एकच निविदा प्राप्त होती.

तदनंतर सदर कामाची नव्याने दि.15/09/2018 रोजीच्या दै. नवशक्ती, हिंदमाता, The Economic Times,. लोकसत्ता या वृत्तपत्रात व Tender Id No. 2018_MBMC_352669_1 अन्वये ई-टेंडरींगद्वारे जाहिर फेर निविदा सुचना प्रसिध्द करून दि. 21/09/2018 पर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर मुदतीत देखील एकच निविदा प्राप्त झाली आहे.

मनपा क्षेत्रातील दैनंदिन साफसफाई व कचरा व्यवस्थापन कामी यापुर्वीच्या निविदेची मुदत संपुन एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. सदयास्थितीत पुर्वीच्या ठेकेदारास मुदतवाढ देऊन काम करुन घेण्यात येत आहे. तथापि नविन निविदा अंतिम करुन निविदाकार नियुक्त करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामी वर नमुद केल्याप्रमाणे निविदा सादर करण्यासाठी पुरेसा कालावधी दिला आहे.

दरम्यान काळात मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक यांचे दि.21/09/2018 रोजीचे पत्रान्वये मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून काळया यादीत टाकले असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकडुन जा.क्र.मनपा/आरोग्य/118/2018-19 दि.24/09/2018 अन्वये पत्र देऊन माहिती मागविण्यात आली होती. सदर बाबत बृहन्मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन खाते सु. र. वाईकर, प्रमुख अभियंता (घनकचरा व्यवस्थापन) यांनी क्र. प्र.अभि/घकव्य/10368 दि. 26/09/2018 अन्वये माहिती email द्वारे कळविण्यात आली असून त्यासंबंधि विधी अधिकारी यांचे दि. 27/09/2018 रोजी अभिप्राय घेण्यात आला आहेत. विधी अधिकारी यांच्या अभिप्रायामध्ये **मे. ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि.** यांची निवीदा उघडणेस हरकत नसल्याचे नमुद केलेले आहे. त्याअनुषंगाने विभागाने सादर केलेल्या टिपणीस मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. उपरोक्त वस्तुस्थिती मा. निविदा समितीच्या निर्देशनास आणलेली आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त एका निविदेचा तांत्रिक लिफाफा दि.24/09/2018 रोजी उघडण्यात आला असता, निविदाकारांनी तांत्रिक लिफाफामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करून दि.27/09/2018 रोजी मा. निविदा समिती समोर सादर करण्यात आली. मे. ग्लोबल वेस्ट मॅनजमेंट सेल प्रा.लि. यांनी निविदेत नमुद केलेल्या अटीशर्ती नुसार सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे.

सदर पात्र निविदाधारक मे. ग्लोबल वेस्ट मॅनजमेंट सेल प्रा.लि. यांचा दराचा लिफाफा (Financial Bid) उघडणेस दि.27/09/2018 रोजी मा. निविदा समितीने मंजुरी दिली. त्यानुसार दि.27/09/2018 रोजी दराचा लिफाफा उघडण्यात आला आहे. मे. ग्लोबल वेस्ट मॅनजमेंट सेल प्रा.लि. या निविदाकाराने निविदेत सादर केलेले दर बाजार भावाशी तुलना केली असता अवाजवी असल्याने दरासंबंधी वाटाघाटी करणेसाठी मा. निविदा समितीने शिफारस केली आहे. त्यानुसार दि.28/09/2018 रोजी मा. आयुक्त यांचे समक्ष निविदा समितीच्या उपस्थित निविदाकार/प्रतिनिधी यांनी निविदादरात वाटाघाटी नंतर खालीलप्रमाणे दर कमी करून काम करण्यास निविदाकाराने मान्य केले आहे.

| Sr. No. | Description of Item | Type of Vehicles Required | निविदेत सादर केलेले दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | Door to door collection of Wet and Dry waste separately on daily basis from the waste generators in 03 and 07 tones capacity vehicles. Daily collection and transportation MSW as per MSW rules 2016 from city to plant site of the Corporation. | Compactor **(New)** (7 ton Capacity close body with four labour ) | Rs.21,000/- Per Day | Rs. 14,500/- Per Day (Per Shift) |
| | | Mini Tipper **(New)** (Mini Tipper 3 Ton capacity close body with four labour ) | Rs,14,000/- Per Day | Rs.11,000/- Per Day (Per Shift) |
| 3 | JCB Machine | Rate Per Hours | Rs. 2,100/- Per Hrs. | Rs.990/- Per Hrs. |

**Part - II**

| Sr. No. | Description of Item | Type of Required | निविदेत सादर केलेले दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | Daily sweeping, cleaning of road, footpaths and public places by manually. Cleaning of gutters twice in a month, collect silt from drain and transport it at plant site | Manpower per day (Inclusive of minimum wages, safety measures, uniform, equipment & administrative charges etc.) | Rs. 1,200/- Per Day Per labour | Rs.955/- Per Day Per labour |

निविदाकाराने प्रती दिन प्रती मजूर रू. 1200/- दर सादर केले होते. मात्र दर वाटाघाटी दरम्यान मा. आयुक्त यांच्या समक्ष झालेल्या चर्चेत ग्रॅज्युटी मुद्दा भविष्यात लागु झाल्यास महापालिकेमारफत देण्यात येईल. त्यानुसार निविदाकारानी रू. 955/- प्रती मजूर प्रती दिन याप्रमाणे दरास संमती दिली. त्याचप्रमाणे निविदा अटीशर्तीमध्ये नमुद केलेल्याप्रमाणे आठ तास (एक शिफ्ट) मध्ये घनकचरा वाहतुक करण्यासाठी उपरोक्त वाहने उपलब्ध करावी.

मिरा भाईंदर शहर मोठ्याप्रमाणावर नागरीकरण होवून नियोजित रस्ते, गटारे त्यप्रमाणे वाढत्या लोंकसंख्येमुळे दररेज निर्माण होणारा घनकचरामध्ये वाहतुक कामाची व्याप्तीनुसार आवश्यकतेनुसार वाहने व मजूरांच्या संख्येत वाढ करणे उचित होईल.

तरी वरीलप्रमाणे वाहने व मनुष्यबळ पुरवठा कामी मे. ग्लोबल वेस्ट मॅनजमेंट सेल प्रा.लि. या निविदाकाराने निविदेमध्ये सादर केलेल्या दरात वाटाघाटी करून कमी केलेले दर स्विकारणेस मा. स्थायी समितीची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका
2-8/9/1?

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Nala Safai 2018.docx